दै. पुढारी दि. 7.12.2022

# धननील लोंढेची योगासन स्पर्धेसाठी निवड



गडहिंग्लज : येथील ओंकार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचा खेळाडू धननील लोंढे यांची भूवनेश्वर (ओडिसा) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ योगासन स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ योगासन संघात निवड झाली आहे. कोवाड येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय योगासन स्पर्धेत धननीलने सहावा क्रमांक मिळविला होता. संस्थाध्यक्ष राजन पेडणेकर, प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश चव्हाण, प्रा. सचिन पाटील, कविता पोळ, मुख्य लिपिक प्रकाश कांबळे यांचे प्रोत्साहन मिळाले. योग शिक्षक सुरेश धुरे यांचे मार्गदर्शन मिळाले.